**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 03.10.2023** **वारः मंगळवार**

**ठळक बातम्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज छत्तीसगड आणि तेलंगणच्या दौऱ्यावर, विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण

निवडणूक आयोगाचं पथक तेलंगणमध्ये निवडणूक तयारीचा आढावा घेणार

वैद्यकीय क्षेत्रातल्या यंदाच्या नोबेल पुरस्कारांची घोषणा

आणि

आशियाई क्रिडा स्पर्धेत भारताची 60 पदकांची कमाई

**पंतप्रधान छत्तीसगढ**
पंतप्रधान नरेंद्र मोदी आज छत्तीसगड आणि तेलंगणच्या दौऱ्यावर जाणार आहेत. छत्तीसगडमध्ये ते 26 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या विविध विकासकामांचं लोकार्पण आणि पायाभरणी करतील. बस्तर जिल्ह्यात राष्ट्रीय खनिज विकास महामंडळाच्या पोलाद प्रकल्पाचं लोकार्पण त्यांच्या हस्ते होणार आहे. तसंच अंतरगड ते तारोकी या दरम्यान नवीन रेल्वेमार्ग आणि जगदलपूर ते दांडेवाडा यादरम्यानच्या रेल्वेमार्गाचं दुपदरीकरण हे दोन्ही प्रकल्पही पंतप्रधान देशाला संबोधित करतील. संध्याकाळी पंतप्रधान तेलंगणच्या निझामाबाद इथं पोचतील आणि सुमारे आठ कोटी रुपयांच्या विकासकामांची पायाभरणी करतील. ऊर्जा, रेल्वे आणि आरोग्य क्षेत्रातल्या विकासकामांचा यात समावेश आहे.

**तेलंगणा- मुख्य-निवडणूक**
मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखील पथक पुढील तीन दिवस तेलंगणातील निवडणूक तयारीचा आढावा घेणार आहे. या पथकाचे सदस्य आज दुपारी विविध राजकीय पक्षांसोबत तसंच निवडणूक संबंधित यंत्रणांसोबत बैठक घेणार आहेत. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडून करण्यात येत असलेल्या नियोजनाचं सादरीकरण त्यांच्यापुढे करण्यात येईल. निवडणूक प्रक्रियेत मतदानाचा टक्का वाढावा आणि नागरिकांमध्ये निवडणूकीसंदर्भात जागरुकता निर्माण व्हावी या उद्देशानं

आयोजित प्रदर्शनाला ही ते भेट देतील तसंच तरुण मतदारांसोबत संवाद साधतील. शेवटच्या दिवशी हे पथक राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांसोबत बैठक घेणार आहे. तेलंगणामध्ये या वर्षाच्या अखेरीस विधानसभा निवडणुका होणार आहेत.

**भाजप-एनओए**

भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. राजस्थान आणि छत्तीसगडच्या विधानसभांच्या आगामी निवडणुकांसाठी पक्षाच्या उमेदवारांची यादी जाहीर करण्याच्या उद्देशानं या बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. राजस्थानमध्ये पक्षाची राजकीय स्थिती भक्कम कशी करता येईल यावर या बैठकीत चर्चा झाल्याचं पक्षाच्या सूत्रांनी सांगितलं. या दोन्ही राज्यांच्या निवडणुकांमध्ये अनेक खासदार आणि मंत्र्यांना उमेदवारी देण्याच्या शक्यतेवरही बैठकीत चर्चा झाली.

**वैद्यकीय नोबेल**

शरीरशास्त्र किंवा वैद्यकीय क्षेत्रातल्या अतुलनीय योगदानासाठी यंदाचा नोबेल पुरस्कार हंगेरियन-अमेरिकन जैवरसायनशास्त्रज्ञ कॅटॅलिन कारिको आणि अमेरिकन शास्त्रज्ञ ड्र्यू वीसमन यांना काल जाहीर झाला. कोव्हिड-19 वरची लस विकसित करण्यात महत्त्वाचा हातभार लावणाऱ्या एमआरएनए, अर्थात मेसेंजर रायबोन्यूक्लीइक आम्लावर महत्त्वपूर्ण संशोधन केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. प्राध्यापक कारिको आणि प्राध्यापक वीसमन यांच्या संशोधनानं मानवी शरीरातलं एमआरएनए आणि रोगप्रतिकारशक्ती यांच्यातल्या परस्परसंबंधांबद्दलची आपल्या आकलनात अमूलाग्र बदल घडवला. आधुनिक काळात मानवतेसमोर उभ्या राहिलेल्या सर्वात मोठ्या आव्हानापैकी एक असलेल्या कोरोनाच्या काळात या रोगावरची लस वेगानं विकसित होण्याच्या कार्यात त्यांच्या संशोधनाचं महत्त्वाचं योगदान आहे, असे गौरवोद्गार नोबेल पुरस्कार निवड समितीनं काढले.

**जितेंद्र सिंह इस्रो**

अंतराळ संशोधन क्षेत्रातलं भारताचं स्थान दिवसेंदिवस उंचावत असल्याचं आणि या क्षेत्रातल्या अग्रणी देशांच्या पंक्तीत आता भारताची गणती होत असल्याचं प्रतिपादन विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी काल केलं. नवी दिल्ली इथं भारतीय अंतराळ संशोधन संस्था, अर्थात इस्रोच्या शास्त्रज्ञांचा सत्कार करताना एका कार्यक्रमात ते बोलत होते. नासा किंवा इतर अंतराळ संशोधन संस्थांनी भारताच्या तुलनेत खूप आधीपासून कामाला सुरुवात केली होती, मात्र इस्रोचं नाव आज या क्षेत्रात आदरानं घेतलं जातं. पूर्वी अमेरिका किंवा रशियासारखे देश भारताला कमी लेखत असत, मात्र आता त्यांना भारतासोबत काम करायचं आहे, असं ते म्हणाले. विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात उत्तम कामगिरी करण्यासाठी समर्पणभावनेने काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांच्यात सहकार्य असायला हवं, असं मत लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी या कार्यक्रमात व्यक्त केलं.

## डॉमिनिकन प्रजासत्ताक-एनओए

डॉमिनिकन रिपब्लिकच्या उपराष्ट्राध्यक्ष राकेल पेना रॉडरिगेज आजपासून पाच तारखेपर्यंत भारत दौऱ्यावर येत आहेत. त्यांचे भारतीय समपदस्थ जगदीप धनखड यांच्या निमंत्रणावरून त्यांचा हा दौरा आखण्यात आल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली. डॉमिनिकन प्रजासत्ताकच्या उपराष्ट्राध्यक्षांनी भारत दौऱ्यावर येण्याची ही पहिलीच वेळ आहे. या दौऱ्यादरम्यान राकेल पेना रॉडरिगेज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. तसंच उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्यासह इतरांशी चर्चा करतील. जागतिक घडामोडींविषयीच्या भारतीय परिषदेत त्या भारत-डॉमिनिकन रिपब्लिक संबंधांवर भाषणही करणार आहेत. भारत आणि डॉमिनिकन रिपब्लिक या दोन देशांदरम्यानच्या संबंधांचं 25 वर्ष आहे. 4 मे 1999 रोजी या दोन देशांनी परस्परसंबंध प्रस्थापित केले होते. डॉमिनिकन रिपब्लिक हा लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन क्षेत्रातला भारताचा महत्त्वाचा भागीदार देश आहे.

## बिहार सर्वेक्षण

बिहारमध्ये या वर्षी दोन टप्प्यांमध्ये घेण्यात जातनिहाय सर्वेक्षणातली आकडेवारी बिहार सरकारनं काल प्रकाशित केली. एकशे एक पानांच्या या अहवालानुसार बिहारची एकंदर लोकसंख्या 13 कोटीपेक्षा जास्त आहे आणि राज्यातला सर्वात मोठा, जातनिहाय गट अतिमागासवर्गीय जातींचा आहे. राज्याच्या एकंदर लोकसंख्येच्या 36 टक्के, म्हणजे सुमारे 4 कोटी 70 लाख नागरिक याअंतर्गत येतात. सर्वेक्षणातल्या आकडेवारीनुसार राज्यात मागास जातींची लोकसंख्या 27 पूर्णांक 12 शतांश टक्के, म्हणजे सुमारे 3 कोटी 54 लाख इतकी आहे. 209 प्रकारच्या उपगटांच्या गणतीत राज्यात यादव गटाचं वर्चस्व असल्याचं या सर्वेक्षणातून समोर आलं आहे. त्यांची टक्केवारी 14 पूर्णांक 26 शतांश टक्के इतकी आहे. अनुसूचित जातींचं प्रमाण 2 कोटी 56 लाख, म्हणजे 19 पूर्णांक 65 शतांश टक्के आहे, तर खुल्या प्रवर्गातल्या नागरिकांचं प्रमाण 15 पूर्णांक 52 टक्के म्हणजे सुमारे दोन कोटी इतकं आहे. राज्यात आदिवासींची लोकसंख्या जातनिहाय आकडेवारीनुसार सर्वात कमी, म्हणजे 1 पूर्णांक 68 टक्के इतकी आहे.

## दहशतवादी

दिल्ली पोलिसांच्या एका विशेष पथकानं काल संशयित आयसिस दहशतवादी शाहनवाज याला दक्षिण दिल्लीच्या जैतपूर इथून अटक केली. राष्ट्रीय तपास यंत्रणा, अर्थात एआयएनं त्याच्यावर तीन लाख रुपयांचं बक्षीस ठेवलं होतं. पुणे आयसिस प्रकरणी शाहनवाजचा शोध सुरू होता. त्याच्या लपून बसण्याच्या ठिकाणावरून पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पाठवलेले बॉम्ब तयार करण्याची कृती लिहिलेले कागद आणि इतर आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आल्याची माहिती विशेष पोलिस आयुक्त एच. एस. धालिवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली. शाहनवाजसोबत इतर दोन संशयित दहशतवाद्यांनाही ताब्यात घेण्यात आलं. त्यांच्यावरही यंत्रणेनं इनाम ठेवलं होतं. या तिघांनाही काल सकाळी न्यायालयासमोर हजर करण्यात आलं आणि न्यायालयानं त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

**आशियाई स्पर्धा**

चीनच्या हांगझू इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांच्या कालच्या नवव्या दिवशी भारतीय क्रीडापटूंनी पदकांची लयलूय सुरूच ठेवली. काल भारतीय खेळाडूंनी तीन रौप्य आणि चार कास्य पदकांची कमाई केली. 4 बाय 4 मिश्र रिले प्रकारात भारताच्या संघानं कास्यपदक पटकावलं. मात्र, रौप्यपदक विजेता श्रीलंकेचा संघ स्पर्धेतून बाद झाल्यानं भारताच्या संघाचं स्थान उंचावलं आणि त्यांना रौप्यपदक देण्यात आलं. महिलांच्या 3 हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात पारुल चौधरी हिनं रौप्य, तर प्रीती लांबा हिनं कास्यपदकाची कमाई केली. महिला आणि पुरुष स्केटिंग रिले संघांनीही दोन कास्यपदकांवर नाव कोरलं. टेबल टेनिसच्या महिला दुहेरीत ऐहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी यांनी ऐतिहासिक कास्य पदकाला गवसणी घातली. या पदकांबरोबरच भारतानं या स्पर्धेत आत्तापर्यंत जिंकलेल्या पदकांची संख्या 60 वर पोचली. यात 13 सुवर्ण, 24 रौप्य आणि 23 कास्य पदकांचा समावेश आहे. आज या स्पर्धेत अडथळ्यांची शर्यत, थाळीफेक, भालाफेक पोल व्हॉल्ट प्रकारात भारताचे खेळाडू मैदानात उतरतील.

**हवामान**

बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि सिक्कीमचा हिमालयीन भाग, उत्तर ओडिशा आणि उत्तर छत्तीसगडमध्ये येत्या दोन ते तीन दिवसांत जोरदार ते मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. नैऋत्य झारखंड आणि उत्तर छत्तीसगडमध्ये कमी दाबाचा प्रदेश तयार झाल्याचं विभागानं नमूद केलं आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातल आज विजांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे. आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेशात पुढचे दोन दिवस तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. तमिळनाडू आणि केरळच्या घाट प्रदेशात मध्यम ते तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. नैऋत्य मान्सूनचा परतीचा प्रवास येत्या दोन दिवसांत पूर्ण होण्यास अनुकूल परिस्थिती असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार**